H&R Western India
Estd : 1951

## मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांना हस्तक्षेप करण्याची विनंती

# आदरातिथ्य उद्योगाला जाचक ठरणाऱ्या कडक नियमांबद्दल HRAWI ने चिंता व्यक्त केली

**पुणे: (समर्थ गांवकरी)**

हॉटेल अँड रेस्टॉरंट असोसिएशन (वेस्टर्न इंडिया)- HRAWI च्या वतीने माननीय मुख्यमंत्री श्री एकनाथ शिंदे; उप-मुख्यमंत्री- देवेंद्र फडणवीस; मुख्य सचिव- डॉ. नितीन करीर; पर्यटन मंत्री- गिरीश महाजन आणि प्रधान सचिव-पर्यटन- सुश्री जयश्री भोज यांच्याकडे व्यवसाय वाढीस अडथळा करणाऱ्या आणि पुण्यातील पर्यटन तसेच आदरातिथ्य क्षेत्राच्या चैतन्याला अडथळा होईल अशा नुकत्याच करण्यात आलेल्या नियामक उपाययोजनांचे पुनर्मूल्यांकन करण्याची विनंती करण्यात आली. HRAWI ने मुख्यमंत्र्यांना



उद्देशून केलेल्या निवेदनात, पुणे पोलीस आयुक्तांनी नुकत्याच कलम 144 अंतर्गत जारी केलेल्या आदेशाबाबत चिंता व्यक्त केली आहे. या आदेशाचे शहरातील आदरातिथ्य उद्योगावर दूरगामी आणि हानिकारक परिणाम होऊ शकतात असे संघटनेला वाटते. रेस्टॉरंट आणि करमणूक आस्थापनांचे नियमन करण्याच्या उद्देशाने देलेला है एक कठोर आदेश असून त्व्यवसाय करण्याच्या सुलभतेत अडथळा आणण्याच्या संभाव्यतेमुळे उद्योगाला धोक्याचे संकेत मिळत आहेत. "यामुळे संपूर्ण उद्योगाला धक्का बसला आहे. सीआरपीसीच्या कलम 144 अंतर्गत जारी करण्यात आलेला हा आदेश अशा कठोर उपाययोजना करण्यासारखी आपत्कालीन परिस्थिती अस्तित्त्वात असल्याचे दर्शविण्यात अपयशी ठरला आहे. विविध प्रकारच्या आस्थापनांमध्ये फरक न करता किंवा कायदा आणि सुव्यवस्थेतील त्यांच्या वैयक्तिक योगदानाचा विचार न करता, विस्तृत व्याप्ति असलेला हाआदेश FLIII परवाना असलेल्या आस्थापनांना अन्यायकारक पद्धतीने लक्ष्य करत आहे.. 'व्यवसाय सुलभता' (इज ऑफ डुइंग बिझनेस) ला प्रोत्साहन देण्यासाठी सरकारने साध्य केलेल्या लक्षणीय प्रगतीला यामळे सुरुंग लागणार आहे आणि पर्यटन क्षेत्रातील रेस्टॉरंट या महत्त्वाच्या विभागावर नियंत्रण आणि नियम लादणे हा यामागचा उद्देश आहे. सरकारने यापूर्वी 19.01.2016 रोजी काढलेल्या परिपत्रकाद्वारे आतिथ्य उद्योगासाठी पोलिस लायसनिंग सिस्टिम रद्द केली होती यामुळे ही बाब विशेषतः चिंताजनक आहे. आम्ही मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांना विनंती केली आहे की त्यांनी पुण्यातील आतिथ्य उद्योग आणि 'व्यवसाय सुलभता' यांचे व्यवहार्यता जपण्यासाठी तातडीने हस्तक्षेप करावा", असे HRAWI चे अध्यक्ष प्रदीप शेट्टी यांनी सांगितले. या निवेदनाद्वारे, HRAWI ने मूलभूत हक्कांवरील कथित अतिक्रमण, असमान निर्देश आणि अशा कठोर नियमांची निदर्शक गरज नसणे यासह आदेशाशी संबंधित अनेक प्रमुख तक्रारी स्पष्ट केल्या. "या आदेशात आस्थापनांना पाहुण्यांच्या वर्तनाचे व्यवस्थापन करण्यासह विशिष्ट भागात नृत्य करण्यास बंदी घालण्याचे आदेश देण्यात आले आहेत. ज्यांना मद्य दिले जाते त्यांनी वाहन चालवू नये अशी अपेक्षाही आहे. दारूचे अतिसेवन आणि दारूच्या नशेत वाहन चालवण्याला अटकाव करण्याची सामाजिक जबाबदारी रेस्टॉरंटची आहे, परंतु अशातऱ्हेची कायदेशीर तरतूद लादणे अव्यवहार्य असल्याचे HRAWI चे मत आहे.